महाराष्ट्र मंडळ डेट्रॉईट

एकमेका सहाय्य करु, अवघे धरु सुपंथ

# स्नेहबंध – विशेषांक

एप्रिल २०२५



# गुढी पाडवा

## नव आरंभ – शुभारंभ

आपले मंडळ

**|| Maharashtra Mandal of Detroit ||**

# Dhake Industries

## The Future of Coatings






- 2K Monocoat
- 2K Base/Clear
- 1K Waterbase
- 2K Waterbase
- One-Coat over TPO/PP
- Adhesion Promoters
- Laser-Etchable Coatings
- Soft-Touch Coatings
- Chrome-Look Coatings
- In-Mold Coatings
- Hydrographics Clearcoats
- Metallic Coating Finishes
- Non-Metallic Coating Finishes
- Much Much More






- Known in the Industry for Unsurpassed Technical Capabilities
- Leader in Metallic Paint Development for Auto Interiors
- Rapid Product Development with Custom Formulations to Meet market and Customer Specific Requirements

**Global Headquarters**

15169, Northville Rd, Plymouth, MI 48170

734-420-0101

www.dhakeindustries.com

# अनुक्रमणिका


| अनु.क्र. | लेख / कविता - नाव | लेखक / कवी | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | स्नेहबंधच्या निमित्ताने | ज्योत्स्ना माईणकर दिवाडकर | ५ |
| २ | Women's Day | वर्षा पाथरे | ९ |
| ३ | टवाळा आवडे विनोद | संजय मेहेंदळे | १३ |
| ४ | मागे वळून पाहताना | डॉ. वीणा शाह | १८ |
| ५ | कशासाठी पोटासाठी, पण अमेरिकेत मराठी कशासाठी? | अभिजित जोगदेव | २२ |
| ६ | प्रेमाच्या गावात | समीर पेशवे | २८ |
| ७ | मराठी शाळा कट्टा | माधवी पुरेकर (मुख्याध्यापिका ट्रॉय शाळा) | ३२ |
| ८ | डॉ. आनंदीबाई जोशी | गितेश पाटील (ट्रॉय मराठी शाळा) | ३६ |
| ९ | सांगे वडिलांची कीर्ती | मुग्धा कर्वे | ४० |
| १० | सिंह | स्वरोम पाटील (कँटन मराठी शाळा) | ४६ |
| ११ | MAHA DEV | डॉ. प्रणव जगताप | ५० |
| १२ | आई | शुभदा प्रभाकर कुळकर्णी | ५६ |


लेखकांना, चित्रकारांना आणि वाचकांना संपूर्ण मतस्वातंत्र्य देण्यात आले आहे. लेखांतून व चित्रांतून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक किंवा आपण सहमत असूच असे नाही, तेंव्हा आपण हा अंक केवळ "मनोरंजनासाठी" आहे अशी अपेक्षा ठेवून वाचावा, ही विनंती!

**संपादक :**
ज्योत्स्ना दिवाडकर

**मुखपृष्ठ:**
अन्विता वाळेकर
अर्चिता बडवे

**रचना व मांडणी :**
अश्विनी राहुल पारठे

# Gudhi Padwa Chya Shubhecha!

Avinash, Hema, Ruchi, Akash and Adarsh Rachmale



The N. Rachmale Foundation

Prosperity Through Service

Avinash and Hema Rachmale

SKY Group Inc.

Sky Group Grand, LLC.
Real Estate Group

Lakeshore Healthcare Group LHG

Lakeshore Healthcare Group, Inc.
Nursing Home & Managed Care

LAKESHORE GLOBAL

Lakeshore Global
Infrastructure Contractors

www.therachmalefoundation.org | www.Lgccorp.com

# ‘स्नेहबंध’च्या निमित्ताने …

नमस्कार! आपणा सर्वांना हिंदू नववर्षाच्या शुभेच्छा. आजच्या कार्यक्रमात आणि आपल्या मंडळात सर्वांचे स्वागत आहे.

आपलं मंडळ म्हणजे काय?

तर वाचक, प्रेक्षक, सभासद, बालक-पालक-शिक्षक आणि प्रत्येक कार्यक्रम यशस्वी व्हावा यासाठी सतत झटणारे मंडळाचे कार्यकर्ते स्वयंसेवक या सर्वांचे मिळून बनलेलं एक मोठं कुटुंब! या कुटुंबात ३ महिने ते ९३ वर्षे एवढा मोठा आयाम असलेले सभासद आहेत. या सर्वांनी प्रत्येक कार्यक्रमाचा आस्वाद घ्यावा म्हणून आपली कार्यकारिणी नवनवीन योजना राबवत असते. ‘सगळ्यांना सगळं आवडतंच असं नाही’ हे साधं तत्व लक्षात ठेवून वेगवेगळे उपक्रम, भारत-अमेरिकेतली नाटकं, गाण्याच्या मैफिली, गणेशोत्सवात बालगोपाळांचा खुला रंगमंच, वैविध्य म्हणून “गीतम्, नृत्यम् तथा वाद्यम्, संगीतम् त्रयमुच्च्यते” या उक्तीला साजेसा एखादा कार्यक्रम- याचबरोबर कुठल्याही संज्ञेत न बसणारे (आणि म्हणूनच ‘रसिक तुझ्याचसाठी’ या व्यासपीठावर) गप्पात्मक प्रयोग आपल्यापुढे आणत असते.

एखादा कार्यक्रम मस्त जमतो. अशावेळी कलाकारांची स्तुती तर कराच पण रात्रभर जागून तो जमण्यासाठी राबणाऱ्या, रंगमंच सजवणाऱ्या, चहा पाण्याची व्यवस्था करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या पाठीवर देखील कौतुकाची थाप मारा!

कधीतरी प्रयोग फसतो, सर्वांना रुचत नाही. मंडळाच्या कार्यकारिणीला तेही जरूर सांगा, पुढच्या वेळेस चूक नक्की दुरुस्त करता येईल. परंतू आपल्याला न आवडलेला प्रयोग दुसऱ्या कोणाच्या तरी पसंतीला आला असेल हे देखील विसरू नका! (एकच कार्यक्रम सगळ्यांना आवडायला तो काही पिझ्झा नव्हे!)

अशीच एक तक्रार-
“हल्ली अंकात वाचायला अगदी कमी असतं, जाहिरातीच जास्त”!
अगदी खरं आहे. पण मायबाप वाचकहो, ते बदलणे तुमच्याच हातात आहे. (अगदी literally!) चला पाहू, पुढचा अंक तुमच्या कथा, लेख, कविता, पाककृती यांनी भरून टाका. आणि जाहिरातींचं म्हणाल, या अंकाची पन्नासेक वर्षांपूर्वीची आवृत्ती खूप वेगळी होती. काहीजण एकत्र येऊन लेख/कविता हाताने लिहून काढीत. का? कारण त्याच्या छापील प्रती काढण्याएवढे मंडळाकडे पैसे नव्हते. खरं म्हणजे तेव्हा मंडळच नव्हतं. काही उत्साही मराठीप्रेमी लोकं एकत्र आली आणि त्यांनी एक गट स्थापन केला. आता त्या गटाचा महागट होऊन, मंडळाचं महामंडळ झालं आहे. हे महामंडळ चालवणं म्हणजे एक MBAचे प्रॉजेक्ट आहे! जाहिराती आणि जाहिरातदारांच्या मदतीने हा जगन्नाथाचा रथ ढकलणे थोडे सुकर झाले आहे.

असो! आत शिरल्याशिरल्या तुम्ही हा अंक चाळत असाल किंवा मध्यंतरात कुतूहलाने अंक उघडला असेल तर तुमचा जास्त वेळ घेत नाही! आणि घरी जाऊन शांतपणे वाचत असाल तर आजचा कार्यक्रम सर्वांना आवडला असेलच ही अशा व्यक्त करून माझं मनोगत इथेच थांबवते.

आता भेटूया पुढच्या अंकात!

**– ज्योत्स्ना दिवाडकर**
(टीम: स्नेहबंध)



# Pradeep Kokate & Family

*wishes you all*




गुढी पाडवा
च्या हार्दिक शुभेच्छा

MAYA PREP


Curriculum Based Kathak
Certified by
Tilak Maharashtra
Vidyapeeth, Pune
ASMI
Dance Academy
For Inquiries Contact
Anagha Huprikar
(Founder of ASMI Dance Academy)
248-701-5275 | asmidanceacademy@gmail.com
Batches at:
Rochester Hills | Troy | Novi | Okemos (Lansing)

# meijer

## Wishes you all



# MMD's International Women's Day Celebration

## "Inspiring Women of our Community"

On March 8th MMD celebrated the 'International Women's Day'. We honored six distinguished women from MMD who have been selflessly volunteering in our community for many years. They are great role models for our community. During this event, their children and grandchildren shared stories about how these ladies inspired them.

When you see any of the following ladies, please thank them for the work they have done for MMD and the community.

We presented them with a plaque with the following message on it.

***We treasure all the lessons you have taught and the love you have spread as you worked selflessly to bring people together. MMD would like to recognize you for being a role model to the community.***

***International Women's Day, March 8th, 2025***

Rita Subhedar was our speaker at the event and she shared with us: The History of Women's Day, "Accelerate Action" (this year's theme) and Issues affecting Indian American Women.

Event pictures and videos are on the MMD website under Events(scroll down to Women's Day)

Back row left to right**:** Sushilatai Pinjarkar, Pramilatai Sardeshpande, Latikatai Manglurkar, Diptitai Sharangpani, Abha Dearing, Ruta Sharangpani, Stephanie Patil

Front row left to right: Neil Bell, Anjali Joshi, Sonali Joshi, Nikhil Pinjarkar, Nikhil Karwande, Arya Karwande






Arya Karwande, Sheelatai Karwande, Nikhil Karwande




From left to right- Rita Subhedar, Neal Karwande (standing in for Sheelatai Karwande), Pramilatai Sardeshpande, Latikatai Manglurkar, Diptitai Sharangpani, Sushilatai Pinjarkar, Stephanie Patil

**– वर्षा पाथरे**
***MMD President 2025***



# Rahul Parthe & Family

## Wishes you









SAT Math & English Test Prep Classes

The EDucation ENrichment Center

www.ed-en-center.com
248.528.1455
2328 Livernois Road, Troy, MI 48085

We have **experienced teachers** provide a **structured approach** to **help students learn new math concepts, improve language arts abilities, and boost test scores**

**ACT/SAT Test Prep**

- ACT Prep course
- SAT Prep course
- Test practice and reviews

**Math**

- K-5 Math
- Pre-Algebra
- Algebra I
- Algebra II
- Geometry
- Trigonometry
- Pre-Calculus
- Calculus

**English**

- K-12 Language Arts
- Grammar
- Reading Comprehension
- Writing
- Vocabulary









## Shubha Gudi Padwa from

# Prakash & Manda Gandhi

# टवाळा आवडे विनोद

"टवाळा आवडे विनोद!" हे समर्थांनी नक्की कोणाला समोर ठेवून लिहिलं माहिती नाही, पण त्या टवाळांच्या रांगेत पहिल्या बाकावर बहुधा मी बसलेला असणार. स्मितहास्यापासून ते खदाखदा हसण्यापर्यंत कुठलाही हास्यप्रकार; आणि ते हसू आणणारा कुठलाही विनोद मला वर्ज्य नाही. अगदी एका वाक्यातील जुने विनोद "दोन सरदारजी बुद्धिबळ खेळत असतात", "बमो पुलंना जोक सांगत होते", "बुडापेस्ट गावातील लोक दातालाच पेस्ट लावतात", आम्ही आमच्या 'कदम' नावाच्या मित्राला, त्याच्या लग्नात  "कदम कदम बढाये जा" दिलेला शुभाशीर्वाद .... उगाच ओठाच्या कोपऱ्यावर स्मितरेषा उमटवून जातात.

अस्मादिकांना टवाळ बनवण्याचा पापात वाटेकरी बरेच आहेत; तरी ते पाप प्रामुख्याने कुणाच्या माथी मारायचं झालं तर तो हक्क निर्विवादपणे पु. लं. चाच!! म्हणजे तशी सुरुवात दिवाकरांच्या नाट्यछटा, 'बेबीचा भाऊ', 'वसंत' लिहिणारे वि. वि. बोकील, 'चिमणराव गुंड्याभाऊ'वाले चि. वि. जोशी यांनी केली होती. पण पुढे 'बटाट्याची चाळ', 'व्यक्ती आणि वल्ली' पासून जो काही विनोदांचा धुमधडाका चालू झाला तो अगदी 'पु. ल. एक साठवण' पर्यंत चालू राहिला. मला वाटतं विनोदाची जाणीव असलेला, हसण्याची देणगी मिळालेला मनुष्य हा एकमेव प्राणी असावा. अस्वल गुदगुल्या करतं असं म्हणतात. पण म्हणून काही एकमेकांना गुदगुल्या करून अस्वलं हसवतात असं ऐकलं नाही. तसं पाहिलं तर आजच्या AI च्या जमान्यात तेही शक्य आहे. दात विचकून दाखवणाऱ्या माकडांचे फोटो समाजमाध्यमांवर बऱ्याच वेळा दिसतात. पण त्याला 'हसणं' म्हणणं हाही एक विनोद होऊ शकतो. पुलंचा विनोद हा निव्वळ विनोद नसतो. त्यांच्या व्यक्तिरेखा त्या त्या काळाच्या हूबेहूब प्रतिमा असतात. बटाट्याच्या चाळीतील त्रिलोकेकर, खरे, कोचरेकर मास्तर; तसेच त्यांचा पेस्तनकाका ही माणसं डोळ्यासमोर जिवंत उभी राहतात. मी चाळीत कधीही राहिलेलो नाही; पण 'बटाटयाच्या चाळीत वरच्या मजल्यावर वीज चढत नसल्याची वदंता होती' किंवा 'बटाटयाच्या चाळीची वीज ही एडिसनला धक्का देणारी होती.' अशी वाक्यं म्हणजे पुलंची खास नर्मविनोदी शैली! 'मी का लिहितो - एक विलापिका' यात त्यांनी मी एका नाटकात "स्थितप्रज्ञ गाढवासारखा असतो" असं लिहिलं.... त्यावर 'चिडलेल्या स्थितप्रज्ञांची' किती पत्रं यावीत...  असं लिहिलं आहे. हाही खास 'पु. ल. टच'! जनू 'बोलट', नाथा कामत, नंदा प्रधान, बापू काणे, चितळे मास्तर, अंतू बरवा अशा विविध व्यक्तिरेखा, त्यांच्या स्वभावविशेषानुसार येणारे विनोद .... हल्ली organic म्हणतात तसं अगदी नैसर्गिकरित्या येतात. 'पुल एक साठवण' या जयवंत दळवींनी संकलित केलेल्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत पुलंच्या आईंचे एक पत्र जोडलेले आहे. त्यात त्यांनी लिहिलं आहे "भाईचं लिखाण माझ्यासाठी आनंद निधान आहे, मन सैरभैर झालेलं असलं की भाईचं कुठलंही पुस्तक वाचायला घेते आणि मन शांत होतं". माझ्याही बाबतीत हे विधान अगदी तंतोतंत खरं आहे.

याच पापाचे पुढील वाटेकरी म्हणजे Calvin and Hobbes पासून ते Pickle, Zits, Garfield पर्यंतच्या सगळ्या comic strips. 'हसरी गॅलरी' वाल्या आपल्या शि. द. फडणीस यांनीही मनमुराद हसवलं आहे. माझ्याकडे Asterix च्या तसंच Tintin च्या बहुसंख्य कॉमिक्सचा साठा आहे. माझ्या मुलींना माझं हे वेड माहिती असल्याने मला दर वाढदिवशी एकेक कॉमिक बुक त्यांच्याकडून भेट मिळतं. अर्थात ही त्यांची investment असते. कारण त्यांनी दिलेलं पुस्तक माझं वाचून झालं की कोणी वाचायचं याविषयी त्यांचे करार आधीच ठरलेले असतात. माझं हसण्याचं वेड पुढील पिढीत संक्रमित झाल्याने मी थोडा चिंतेत असतो. पण अशाच एका वाढदिवशी माझ्या बाथरूममधल्या आरशावर 'Objects In The Mirror Are Older Than They Appear' हे Zits चं सुवचन वाचून आपल्या मुलामुलींना वेगळं शिकवावं लागत नाही, काही गोष्टी उपजतच येतात हे जाणून निर्धास्त होतो.






दिवसभर आभासी वास्तवात, चमकत्या पडद्यावर कितीही वाचन चालू असलं तरीही रात्री झोपायच्या आधी मात्र मला वाचायला खरंखुरं पुस्तकच लागतं. आताशा झोपायच्या आधी serious reading करायला झेपत नाही; म्हणून यातलं कुठलंही कॉमिक्स घेऊन वाचायला सुरवात करतो आणि दिवसाच्या शिणवट्याचा विसर पडतो.

माझ्यावर अनेकविध संस्कार केलेल्या हिंदी सिनेमातल्या विनोद खन्ना, मेहेरा आदी प्रभृतींविषयी माहिती होईपर्यंत 'विनोद' हे कुणाचे नाव असू शकतं हे माहीतही नव्हतं. त्यांचे आईबाबा कोणाला आपल्या मुलाविषयी सांगतांना "हा आमचा विनोद!" हे कसं सांगत असतील असा प्रश्न मला पडत असे. असो! बाकी हे नामधारी विनोद सोडता जॉनी वॉकर, केष्टो मुखर्जी, असरानी, जगदीप, मेहमूद, राजेंद्रनाथ, परेश रावल अशा एकसे एक विनोदवीरांनी हिंदी सिनेमांतील अनेक प्रसंग अक्षरशः काळाच्या पडद्यावर कोरून ठेवले आहेत. शोले सिनेमातला "हम अंग्रेजोंके जमानेके जेलर हैं" वाला असरानी, पडोसन सिनेमातला "ये घोड चतुर क्या है जी एकपे रहाना; या तो घोड बोलना, या तो चतुर बोलना" वाला मेहमूद, सोडा वॉटर छाप चष्मा लावलेला हेराफ़ेरीतला 'बाबुराव गणपतराव आपटे' झालेला परेश रावल, "तो ये लकडी भी दो रुपये की है. दो रुपये में क्या आप सारा भंडार खरीदने निकले थे" म्हणणारा शोले सिनेमातलाच सुरमा भोपाली जगदीप..... या साऱ्यांनी लोटपोट हसवलं आहे. असाच एक सर्वांगसुंदर सिनेमा 'अंगुर'! अगदी OMG म्हणावं असा!! किती वेळा पहिला असेल याची गणतीच नाही. या सिनेमाचा विषय निघाला की माझी बायकी मला वेडा म्हणते (आणि मी तिला!!) आधीच संजीवकुमार आणि देवेन वर्मा ही दुक्कल आणि त्यातून त्यांचा 'डबल रोल'! मी तर अनेकदा पाहिलेल्या विनोदांवर हसत असतो!! कायिक, वाचिक अभिनयाचा बादशहा संजीवकुमार त्याची भूमिका अक्षरशः गात्रागात्रातून आपल्यापर्यंत पोहोचवतो. पुलंची पुस्तकं परत परत वाचतांना जसं विनोदाच्या नवीन नवीन जागा सापडतात; तसेच या सिनेमाच्या बाबतीत होतं. संजीव कुमारची नसलेली सिगरेट शिलगावण्याची, नसलेली काडी विझवण्याची, नसलेली रिव्हॉल्वर फिरवण्याची action अगदीच लाजवाब! बलिहार बलिहार!! आणि म्हणूनच हास्याचा स्फोट उडविणारी!!! हिंदी सिनेमांइतकीच विनोदाची गोडी लावण्यात आघाडीवर असणारे लहानपणापासूनचे साथीदार म्हणजे लॉरेल हार्डी, चार्ली चॅप्लिन आणि नंतर थ्री स्टुजेस. Moe, Larry, Curly, Shemp.... एकाहून एक वरचढ. मला व्यक्तिशः Curly जास्त आवडतो. मी काम करतो तिथेही "समानशीले-व्यसनेषु सख्यम्" उक्ती प्रमाणे Three Stooges चे सगळे फॅन्स आहेत. आमच्या servers ची नावं सुद्धा Moe, Larry, Curly, Shemp अशीच आहेत. अर्थात मराठी सिनेमे, विशेषतः दादा कोंडके, काही मागे नाहीत. सोंगाड्या, एकटा जीव सदाशिव, पांडू हवालदार या सिनेमांनंतर आलेले सिनेमे मला फारसे आवडले नाहीत. तीच कथा नंतर आलेल्या 'विनोदी' मराठी सिनेमांची. 'एक डाव भुताचा' वगळता कुठलाही सिनेमा मला पोट धरधरून हसवू शकला नाही. अगदी विनोदाचा बादशहा असलेला 'लक्षा'चे सिनेमे सुद्धा!! अर्थात माझी विनोदबुद्धी कमी पडत असेल याची मला जाणीव आहे.

जी गोष्ट सिनेमांची तीच नाटकांची. यात बबन प्रभू, याकूब सईद यांच्या जुन्या कृष्ण धवल सिरिअल्स येतात, किशोर प्रधान, शोभा प्रधान, आत्माराम भेंडे येतात. 'काका किशाचा' पासू  लक्षा आणि विजय कदमचं 'टूरटूर' येतं. राजा गावडेचं 'बिघडले स्वर्गाचे दार' येतं. एका मुलाखतीत "टक्कल पडल्याचा काही तोटा जाणवतो का?" या प्रश्नावर "तसा फारसा नाही; पण सकाळी तोंड धुवायला वेळ लागतो! कारण चेहेरा कुठे संपतो ते कळत नाही!!" असे उत्तर देणारे 'अप्पाजींची सेक्रेटरी'वाले शरद तळवलकर येतात. यातील 'टूरटूर' नाटक माझ्या विशेष आवडीचं. काहीही लिखित स्क्रिप्ट आहे असं वाटूच नये असं नाटक. नाटकात कामं करणारे विजय कदम, विजय केंकरे, प्रशांत दामले, दीपक शिर्के सगळेच मित्र! या साऱ्यांना भेटायला जाऊन, विंगेत उभं राहून हे नाटक कितीतरी वेळा पाहिलं. स्क्रिप्टमध्ये नसलेल्या, करंट टॉपिक वर बेतलेल्या, अशक्य additions घेणारे; आणि दुसऱ्याने अशा additions घेतल्यावर blank न होणारे हे सगळेच चटपटीत कलाकार आणि त्यामुळे दर वेळेस विनोदाचा नवनवा अनुभव देणारे हे नाटक.

या साऱ्यांनीच माझं 'सकाळ झाली; भैरू उठला' छापाच्या एकसुरी आयुष्यात हास्याचे मळे फुलवले. पुलंनी 'हसवणूक' (फसवणूक) पुस्तकाच्या प्रस्तावनेत 'जन्म आणि मृत्यू या दोन टोकांच्या मध्ये पकडून नियतीने चालवलेली आपल्या साऱ्यांची फसवणूक एकदा लक्षात आली की त्यातून सुटायला आपली आणि आपुलकीने भोवताली जमणाऱ्या माणसांची 'हसवणूक' करण्यापलीकडे आणखी काय करायचं?' लिहिल्याप्रमाणे रडत, कुढत उदासीन जगण्यापेक्षा; हसत हसत जगावं हे केव्हाही चांगलं!!

**– संजय मेहेंदळे**

# Gudi Padwachya Shubhecha

Taal Academy

Taal Academy of Kathak Dance

## || Maharashtra Mandal of Detroit ||




MANDAL

# Bhushan Kulkarni & family
## Wishes you all



# नुतन वर्षाभिनंदन

SK International

ENGINEERED EXCELLENCE.

## ENGINEERING, DESIGN, AND MANUFACTURING SERVICES

### About Us

SK International, an ISO 9001 certified company, is a leading provider of engineering services and automation solutions. We specialize in custom engineering works and in the making of special purpose machines that are tailored to suit and adapt to all changing requirements. Some of our additional specialties include 3D CAD, Building Information Modeling (BIM), Civil Engineering, Factory Automation, Mechanical Engineering, and Precision Machined Parts.



46918 Liberty Drive, Wixom, MI, 48393
(248) 621-9608
sales@skinternational.us
www.skinternational.us

# मागे वळून पाहतांना

मागे वळून पाहतांना
जीव दडपून गेला.
किती दूर, किती उंच आलो आपण.
कसे आलो?
आठवतो, तो पाठीवरून फिरलेला हात.
थरथरता तरीही आश्वासक.
उंबरठ्यावर पाऊल अडले, तेव्हा
सांगणारा- जा, निःशंक
विशाल आहे तुझे क्षितिज
सीमित करू नको त्याला
या छोट्या परिघात.
केव्हाही ये विश्रांतीला
आहेच तुझे स्वागत या घरट्यात.
आता,
काळजाचा लचका तोडणारा हा प्रश्न-
ज्यांनी दिले पंखांमध्ये बळ,
तेच कसे झाले इतके हतबल?
आकाशझेपेची मोजायलाच हवी का ही किंम
वाट पाहणारे डोळे,
थकतात हजारो मैलांवरती.
व्हॉट्सऍप, फेस टाईम
दुधाची तहान ताकावरती



**– डॉ. वीणा शाह**



# Nutan Varshachya Hardik Shubhecha!






KURRYS
INDIAN CUISINE

24361 Halsted Rd, Farmington Hills, MI 48335
248-826-2014

/kurrysrestaurant
www.kurrys.com


नव वर्ष
मंगलमय
हो
Ram Creations
Jewelry & Gifts
FOLLOW US
28974 Orchard Lake Rd
Farmington Hills, MI 48334
248.851.1400 | info@ramcreations.com | www.ramcreations.com

# कशासाठी पोटासाठी , पण अमेरिकेत मराठी कशासाठी ?

पोटासाठी भटकत जरी दूर देशी फिरेन,
मी राजाच्या सदनी अथवा घोर रानी शिरेन ।
नेवो नेते जड तनुस या दूर देशास दैव,
राहो चित्ती प्रिय मम परि जन्मभूमी सदैव ।।

शाळेत असताना कुमारभारती पुस्तकात शिकलेली वासुदेवशास्त्री खऱ्यांची कविता कधी जीवनगाणं होऊन गेली हे कळलंच नाही आणि ह्या प्रवासात मराठीसाठी काही करायची प्रेरणा कशी मिळाली ते शब्दात मांडण्याचा हा एक प्रयत्न. वासुदेव शास्त्रींनी म्हटल्याप्रमाणे कामानिमित्त भारत, जर्मनी, चीन अशा देशात भटकून आता अमेरिकेमध्ये स्वत:चं सदन करून स्थिरस्थावर झालोय खरा पण सातासमुद्रापार अनोळखी व्यक्ती, अपरिचित संस्कृतीच्या घोर रानात चहूबाजूंनी इंग्रजी-स्पॅनिशचं वादळ घोंघावत असताना मायमराठीचं रोपटं जपायची आणि पुढच्या पिढीत रुजवायची जाणीव कशी, कधी आणि का प्रबळ होत गेली त्याचा हा धांडोळा.

२०१५ मध्ये डेट्रॉईट मिशीगनला international assignment वर expat म्हणून आलो आणि २-३ वर्षात भारतात परतायचं असं ठरवून संसाराचा एक छोटासाच तात्पुरता संच इथे उभा केला. पहिल्या मुलीचा इथला जन्म, नवीन काम, ऑफिस ह्यामध्ये रुजता रुजता २-३ वर्ष सरली पण तरी अजून इथल्या चाली-रीती-भाती, मूल्य ह्यांची पूर्ण ओळख होत होती. भारतातल्या ब्रिटिशोद्भव इंग्रजीची तर इथे अमेरिकन इंग्लिशमुळे दिवसाढवळ्या धिंड निघत होती. चेकला बिल, बिलाला चेक, सायकलला बाईक, बाईकला मोटरसायकल अशी भंबेरी कमी म्हणून दिव्याचं switch वर केलं की बंद आणि खाली केलं की चालू असल्या प्रकारांनी आमचे फ्यूज पार उडून गेले होते (अजूनही मी switch बरोबर उलटंच दाबतो). एव्हाना २ वर्षाच्या झालेल्या माझ्या मुलीची ABCD मध्ये म्हणजे अमेरिका बॉर्न कन्फ्युज्ड देसींमध्ये भर पडली होती. घरात मराठी, बायको गुजराथी असल्यामुळे तिचा, सासरकडच्यांचा मुलीशी संवाद गुजराथीतून आणि मुलीच्या शाळेत, शेजारपाजाऱ्यांशी इंग्रजी-स्पॅनिश संवाद, त्यामुळे तिने तिची अशी एक वैश्विक भाषा निर्माण केली होती. तर अशा ह्या भेळ-मिसळ केंद्राची अजून भरभराट व्हायच्या आत आमचा इथून गाशा गुंडाळायचा प्लॅन होता. पण नियतीच्या मनात काही वेगळंच होतं.




इथल्या कंपनीने फक्त expat म्हणून काम न करता त्यांच्याचबरोबर काम करायची ऑफर दिली आणि L1-A व्हिसा असल्यामुळे एखाद वर्षात ग्रीनकार्ड करून द्यायची तयारी पण दर्शवली. करियरच्या दृष्टीने आलेल्या उत्तम संधीचं सोनं करण्यासाठी घरातल्या साठी-सत्तरीकडे झुकणाऱ्यांचा पूर्ण पाठिंबा आणि बायकोची इथे संसार-करिअर करायची तयारी ह्यांनी निम्मा प्रश्न सहज सुटला पण इथल्या भिन्न भाषा-संस्कृतीमध्ये काका-मावशी, आजीआजोबांपासून दूर, मुलांना वाढवायची धाकधूक वाटत होती. आपले आप्त-मित्र, आपलं सगळं social circle भारतात सोडून असं अचानक दुसऱ्या संस्कृतीत सामावून जाणं जरा आव्हानात्मक वाटत होतं. ‘Here’ or ‘To-Go’च द्वंद्व चालू असताना आत कुठेतरी जाणीव व्हायला लागली होती की जरी आपण इथल्या संस्कृती-मूल्यांना आत्मसात करायचा प्रयत्न करत असलो तरी आपल्या मुलांच्या ओंजळीत आपली मूळ भाषा-संस्कृतीमूल्ये द्यायची जबाबदारी पण आपलीच आहे.

सरतेशेवटी, आयुष्याच्या तिशीत पडलेल्या या ‘American Dream’ ला वास्तवात उतरवायचं ठरवलं आणि त्याचबरोबर इकडे दूरदेशी, मराठीची सेवा करायची आलेली संधी आणि आव्हान स्वीकारायचे मनोमन ठरवले. इथे समाजात वावरताना नजरेस जाणवणारी मराठीची अनुपस्थिती, दुकाने-बाजारपेठांत कधीच न दिसणारे मराठी फलक आम्ही स्विकारलेल्या आव्हानाचे कायम स्मरण करून देत असतात. कुठेही खरेदी करायला, किंवा फिरायला पार्क मध्ये गेलं आणि कानावर मराठी पडलं तर आपसुकच ओळख करून घ्यायला धडपड करायचो, अजूनही करतो. त्यातूनच ओळखी होतहोत, मराठीजनांच्या भेटीगाठी नंतर काही गोष्टी ठळकपणे जाणवल्या त्या पुढील प्रमाणे-

**१**. दहा-बारा वर्षाची मुले, ज्यांनी मराठीचं विशेष शिक्षण घेतलं नाहीये ती भारतातील आजी-आजोबा आणि नातेवाईकांशी “कसे आहात?/ काय करताय?” ह्याच्या पलिकडे मराठीतून संवादच साधू शकत नाहीयेत आणि सगळेच आजी-आजोबा, नातेवाईक मुलांशी इंग्रजीमधून संवाद साधू शकत नसल्यामुळे, नात्यामध्ये जो अपेक्षित ओलावा, बंध पाहिजे तो निर्माणच होऊ शकत नाहीये.

**२**. ज्यांची मुले वयवर्षे १० आणि त्या पुढील आहेत अशा बऱ्याच पालकांना आपल्या मुलांना मराठी भाषा, संस्कृतीची ओळख, आवड नसल्याची खंत आहे आणि मुलांनी मराठी शिकावं अशी मनापासून इच्छा आहे.

***३.*** *असेही काहीजण भेटले जे म्हणाले, की कशाला शिकायचं मराठी इथे राहून? काय उपयोग होणारे मुलांना त्याचा त्यांच्या करियर मध्ये?*

*त्यापेक्षा आम्ही स्पॅनिश, फ्रेंच भाषा शिकवतो/ मुले शिकतीलच शाळेत ते. ह्या मुद्द्यानी जरा काही काळ भ्रमित व्हायला झालं पण ओळखीच्यातल्या मुलांची नातेवाईकांशी भाषेमुळे तुटलेली संभाषणं, नाती बघून भानावर आलो.*

**४.** बहुतांशी पालकांना मुलांमध्ये मराठीची आवड निर्माण करायची इच्छा तर आहे पण योग्य माध्यम, संधी आणि सातत्यपूर्ण परिश्रम ह्याची कमतरता आहे.

**५.** कामाच्या स्वरूपामुळे/ व्हिसाच्या मर्यादेमुळे पालकांना भारतात परतावे लागू शकते त्यामुळे परतल्यावर सामाजिक,व्यावहारिक त्रुटी मुलांना भासू नये म्हणून पण मुलांना मराठीचा सराव ठेवण्यासाठी पालकांची धडपड आहे.

**६.** मुले किंडरगार्टेन मध्ये जाईपर्यंत घरात मराठीतून संभाषण होतंय पण त्यानंतर पहिली-दुसरीमधील मुले इंग्रजीच्या वाढत्या वापरामुळे आणि घरातली मराठीची शिकवणी मागे पडल्यामुळे इंग्रजीतूनच प्रतिसाद देत आहेत आणि मुले एकदा का १०-१२वर्षाची झाली किंवा Middle school मध्ये गेली की शाळा, projects, extra-curricular activities च्या व्यापामुळे मराठी शिक्षणाला दुय्यम स्थान मिळत आहे आणि सरावातील सातत्य राहत नाहीये. बहुतेक पालकही मुलांकडे मग "You must talk to me in Marathi हं" असा लडिवाळ हट्ट धरताहेत पण फक्त अशाने मराठीचा पैलतीर सोडलेलं ते गलबत कसं किनाऱ्यावर परतणार?

ह्या सर्व अनुभवांच्या चिंतनातून मनोमन खात्री पटली की मुलांचा ६-७ वय वर्षापर्यंतचा काळ मराठीमध्ये रुची यायला, सराव करायला सर्वोत्तम आहे. मुलांना त्या वयात एकदा रुची निर्माण झाली की मग मुले १०-१२वर्षाची होईपर्यंत अत्यंत सफाईदारपणे मराठी बोलू, लिहू शकतात, संभाषण करू शकतात. घरातल्या घरात मराठी सराव करण्यापेक्षा इतर मुलांबरोबर मिळून नियमित मराठी शिकण्याची सोय असल्यास हा अभ्यास सुखकारक याची जाणीव झाली.

इथल्या मराठीच्या शोधामध्ये डेट्रॉईटच्या महाराष्ट्र मंडळाच्या साप्ताहिक मराठी शाळेबद्दल माहिती मिळाली. १२-१५ पटसंख्या आणि २-३ शिक्षक असा मराठीच्या उत्साही शिलेदारांचा दर रविवारी भरणारा सोहळा खूपच कौतुकास्पद वाटला. मराठीची सेवा करायची, आपल्या पुढच्या पिढीला मराठीशी जोडायची याहून चांगली संधी आणि चांगले व्यासपीठ मिळणार नाही याची खात्री पटली आणि २०१८ ला मीही डेट्रॉईटच्या दक्षिणेकडील, Canton शहरातील शाळेत स्वयंसेवक म्हणून रुजू झालो.




एव्हाना दुसऱ्या मुलीचा जन्म झाला होता. आपल्या मूळ भाषेची गोडी लावायची जबाबदारी फक्त कुटुंबापुरती मर्यादित न राहता, आई-वडिलांच्या आग्रहास्तव शाळेत येणाऱ्या, मराठीला "मरॉटी" म्हणणाऱ्या अजून १२-१५ मुलांची देखील जबाबदारी घेतली होती. महाराष्ट्रात शिकत असताना इंग्रजी ही 'वाघिणीचे दूध' वाटायची पण इथे इंग्रजांच्याच देशात वाढणाऱ्या मुलांना मराठी शिकवत असताना मराठीच खरी 'Tiger's milk' आहे ह्याची प्रचिती यायला लागली. 'ई' ईडलिंबूचा पेक्षा, 'ई' e-mail चा, 'उ' उखळीचा पेक्षा 'उ' UNO चा अशी उलटी गंगा वाहवावी लागली. In this country of Plenty, 'अति तिथे माती' चा अर्थ समजावून सांगताना दमछाक होत होती. या Gen-Alphaच्या कलेकलेने घेत आता आमचा ABCD ते अबकड चा साप्ताहिक प्रवास चालू झाला होता.



२०१९-२० मध्ये करोनाच्या थैमानामुळे प्रत्यक्ष भेटीगाठी शक्य नव्हत्या पण Google Classroom च्या माध्यमातून आम्ही मराठीशी नाळ कायम जोडलेली ठेवली. मराठी भाषा-परंपरांना साजेसे शाळेतील उपक्रम, गणेशोत्सवात शाळेतील मुलांनी सादर केलेले मराठीशी नातं सांगणारे उत्तमोत्तम कार्यक्रम यांनी शाळेची माहिती लोकांमध्ये पोचली आणि २०२४-२५ येईपर्यंत Canton शाळेची विद्यार्थीसंख्या १२-१५ वरून पार ७५च्या पलीकडे गेली. बहुतांशी पालकांना भासणारी मराठी शिक्षणाची उणीव आणि त्यातून मराठी शाळेला मिळणारा पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद बघून आम्ही अजून एक शाखा उघडली.इथल्या मातीशी-हवामानाशी जवळीक ठेवून, भारतीय-मराठी परंपरा सण, इतिहास याच्याशी पण दुवा साधत BMM-भारती विद्यापीठाने रचलेला अभ्यासक्रम हा या सर्वाचा भरभक्कम पाया आहे. तसेच महाराष्ट्र मंडळाच्या सांस्कृतिक कार्यक्रमात मुलांना मिळणाऱ्या संधी, त्यांच्याच



वयाच्या आणि त्यांच्याच सारखे इंग्रजाळलेले मराठी बोलणाऱ्या मुलांबरोबर वावरायच्या संधी, मराठीची उणीव काही प्रमाणात नक्कीच भरून काढतात. मुलांच्या careerच्या दृष्टीने विचार करता, २०१९ पासून मिशीगन राज्याने मराठीला 'परकीय भाषेचा' दर्जा दिल्यामुळे, विद्यार्थी मराठी शिकून-योग्य परीक्षा देऊन Highschool मध्ये २ credits सहज मिळवू शकतात.

अमेरिकेचे नागरिकत्व स्विकारून आता इथेच स्थायिक झाल्यावर, Gen-alpha च्या ओंजळीत मराठीचा काहीतरी मेवा ठेवायची संधी मिळाल्याची भावना खूपच सुखद आहे. स्वत:च्या दोन्ही मुली आणि साप्ताहिक शाळेमधील इतर मुलांना घरी, भारतातील आजी-आजोबांबरोबर, नातेवाईकांबरोबर मराठीतून गप्पागोष्टी करताना, हसताना खिदळताना बघून खूपच छान वाटतं. मुलींना घेऊन पुण्यात एका लग्नसमारंभात गेलेलो असताना एका आजींबरोबर दोन्ही मुलींनी इतक्या छान गप्पा मारल्या की आजी नंतर मुलींच्या मराठीचं कौतुक करताना रडल्या, म्हणाल्या, मुलींच्या मराठीच्या वापरावरून मुली अमेरिकेत वाढतायेत असं वाटतच नाहीये, माझ्या सख्या नातींनी पण जर माझ्याशी अशा गप्पा मारल्या असत्या तर आयुष्याच्या शेवटी काही खंत राहिली नसती... आजींची अशी पावती मनाला चटका लावून गेली आणि सातासमुद्रापार आपण घेत असलेल्या मराठीच्या परिश्रमाचं चीज झाल्याचं समाधान वाटलं.

एवढ्यावरच सुखावून जाऊन इथेच न थांबता मराठी शाळेच्या माध्यमातर्फे मराठीची सेवा करत राहायची मनोमन इच्छा आहे. नुकताच ऑक्टोबर २०२४ मध्ये मराठी भाषेला 'अभिजात' भाषेचा दर्जा प्रदान झाला आहे, तेंव्हा तिचा अभिजातपणा, classical status जपायची जबाबदारी इथे सातासमुद्रापार आपल्या सर्वांवर पण आहे.



इथे लहानाचे मोठे होणाऱ्यांनी आपल्या मायबोली मायमराठीला, "My Marathi" म्हणून मिरवलं की अभिजात भाषेचा दर्जा सिद्ध करायची पुनःश्च गरज पडायची नाही. इथल्या समाजात वावरताना आपल्या मराठी भाषेचे-संस्कृतीचे अदृश्य धागे गुंफून जो कोष बनवतोय, त्यातून पुढे जाऊन मराठीत संवाद साधू शकतील अशी सुंदर फुलपाखरं बहरतील अशी खात्री आहे.

*America Born Confused Desi* म्हणजेच ABCD मुलांना मराठीच 'गमभन'चं भान आलं, श्लोक, प्रार्थना, कविता-साहित्य यातलं थोडंफार समाजलं, उत्तम चित्रपट-नाटक कलाकृती समजल्या तसेच आपले सण, भारत-महाराष्ट्राबद्दल समजले, आजीआजोबांशी, बहिणभावंडांशी मराठीत गप्पा मारता आल्या आणि पुणेरी पाट्यांमधला खोचक पण थेट अर्थ कळून हसू आलं की माझी मोहीम फत्ते! मग इथे अमेरिकेत मराठी कशासाठी? ह्या प्रश्नाची उकल पावलोपावली होईल पण त्यासाठी फक्त इच्छा नाही तर मुलांबरोबर १०-१२ वर्षाची तपश्चर्या लागेल. A for "Apple" जसं यायला पाहिजे तसेच A for "Aapli मराठी" ह्याची पण आठवण राहिलीच पाहिजे.

**अभिजित जोगदेव**

**कँटन, डेट्रॉईट मिशीगन |मराठी शाळा मुख्याधापक आणि BMM समन्वयक (फेब्रुवारी २०, २०२५)**

# Wish you all Happy Makar Sankranti










Suhana®
Happy Gudi Padwa
Celebrate this festive period with Suhana's
63 years old legacy & tradition
SPICE UNIVERSE LLC
info@spiceuniverseusa.com
+1(947)267-1733
spiceuniverseusa.com

FinesseAcademy

**Confidence Building & Public Speaking Course**

**PROGRAM DETAILS:**

- Session 1 In-person Troy -Wednesdays: Sept 25th - Dec 4th 7-8.30pm
- Session 2 Virtual - Thursdays : Sept 26th - Dec 5th 8-9.30pm
- Session 3 In-person Troy -Saturdays: Sept 28th - Dec 7th 7-8.30pm
- Session 4 In-person Livonia -Sundays: Sept 22nd - Nov24th 2-3.30pm
- Session 5 In-person Livonia -Sundays: Sept 22nd - Nov24th 4-5.30pm
- For more details, contact:

vidhi@finesseacademy.com 313-283-4343

**Gudi Padwachya Shubhecha!**

MEDSTAR
REHABILITATION SERVICES, INC

**PHYSICIAN'S PREFERRED PROVIDER FOR PHYSICAL,**
*OCCUPATIONAL, AND SPEECH THERAPY*
2050 HAGGERTY ROAD, SUITE 280
CANTON, MI 48187

**PHONE**: 734-844-0800 **FAX**: 734-844-0808
**EMAIL**: MEDSTARREHAB@MEDSTARREHAB.COM

# प्रेमाच्या गावात

प्रेमाच्या या गावामध्ये,
उतार काही वळणे काही,
जाणिवांचा बांधून रस्ता
आपण शोधू स्वप्ने काही.

बंधनांच्या सोडा बेड्या,
मोकळ्या मनी बोला काही,
शब्द वेचून तुझ्यासाठी,
देतो मी ही वचने काही.

आयुष्याच्या मंचावर या,
सूरात मिसळू सूर काही,
भावनांचा ताल पकडून,
आपण गाऊ गीते काही.

**– समीर पेशवे.**






# PATEL BROTHERS®

## *Wishes you all*






JAYA
TRAVEL & TOURS

# Europe Tours Starting at $1,999





*49 years of tour planning experience!*

To Book Call 1-800-209-0187 or Email letsgo@jayatravel.com

## All-inclusive land packages with:

- Daily Indian vegetarian and non-vegetarian meals with Jain or Swami Narayan food available with request
- Guaranteed departure dates April through October
- Superior hotel accommodations
- Sightseeing, excursions, entrance fees, and transfers
- Jaya Travel tour manager throughout the tour

For details

# Proud to Support Those Who Help So Many



HERITAGE
INSURANCE

With best compliments of Heritage Insurance Holdings, Inc. and *Vijay S. Walvekar*, a Co-Founder and Directior.

heritagepci.com ◆ 855-536-2744

निबंधलेखन

